गोपनीय

क्रमांक बदली २००८/प्रक्र ४/प्रशा ३
गृहनिर्माण विभाग,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - ८.८.२००८

प्रति,
उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.

विषय- प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांच्या सन २००८ च्या नियतकालीक बदल्यांबाबत

संदर्भ:- आपले जा.क्र. प्राधि/बदली/२००८ दिनांक निरंक चे पत्र

महोदय,

म्हाडा अंतर्गत अभियंता संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदली संदर्भात शासनास प्राप्त झालेले अर्ज/शिफारशी वेळोवेळी आपणांकडे अभिप्रायार्थ पाठविण्यात आले असून त्यावर आपले अभिप्राय शासनास प्राप्त झाले आहेत. प्राप्त झालेले सर्व बदली प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी आपणाकडे पाठविण्यात येत आहेत. खालील मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन बदली प्रस्तावांवर बदली ~~कायदा~~ अधिनियम २००५ व प्रचलित नियमानुसार योग्यती कार्यवाही करण्यात यावी.

१) तीन वर्षे एकाच पदावर कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्या करण्यात याव्यात.

२) एकाच मंडळावर शक्यतो किमान ६ वर्षे पुन्हा नियुक्त्या देण्यात येऊ नयेत.

३) गंभीर स्वरुपाच्या तक्रारी असलेल्या अधिकाऱ्यांना महत्वाच्या आणि संवेदनशील पदावर ठेऊ नयेत.

केलेल्या कार्यवाहीचा कार्यपूर्तता अहवाल शासनास तात्काळ सादर करण्यात यावा, ही विनंती.

आपला विश्वासु,

(दिलीप शिंदे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत-वरीलप्रमाणे.

rita letter svm २००८.३.३१